MHLA050008382016

## नियमीत दिवाणी दावा क्र.७६/२०१६ मधील नि.क्र.९६ व ९९ खालील आदेश
## ( नाझीर ..वि.. अफजल व इतर )

सदर अर्ज वादीने देऊन नमुद केले की, वादीने याकामी एक नोटरी दस्त हजर केला असुन त्याची मुळ प्रत वादीकडून हरवली आहे. अनेक प्रयत्न करुन ती मिळत नाही. त्याची प्रत याकामी हजर केली आहे. तो अत्यंत महत्वाचा दस्त असुन दावा निर्गत करण्यास उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे या दस्तावर दुय्यम पुरावा देण्याची परवानगी वादीने मागितलेली आहे.

२. नि.क्र.९९ लगत वादीने अर्ज देऊन नमुद केले की, दावा चौकशीकरीता असुन वादी हा दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार आहे. याकामी नोटरी दस्त वादीच्या लाभात असुन तो अत्यंत महत्वाचा आहे. तो दस्त पटलावर येणे अत्यंत आवश्यक असुन त्यायोगे वादमुद्दा निर्गत करण्यास मदत होणार आहे. या दस्ताची स्वसाक्षांकित प्रत दाखल असुन नोटरी वकिल श्री.पी.एस.पौळ यांच्याकडे तो नोंद झाला आहे. सदर दस्त महत्वाचा असुन श्री.पौळ वकिलांची साक्ष या दस्तावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे श्री. पौळ वकिलांना साक्षी समन्स काढण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने म्हणणे देऊन कथन केले की, या साक्षीदाराचा दाव्याशी संबंध नाही. नि.क्र.९६ लगत दिलेले म्हणणे याकामी वाचावे.

४. नि.क्र.९६ वर प्रतिवादी यांनी कथन केले की, या दस्ताबद्दल वाद कथन वादपत्रात कोठेही नाही. त्यामुळे या दस्तावर दुय्यम पुरावा देण्याची गरज नाही. सदर दस्त बनावट असुन दावा दाखल करण्यापुर्वी तो वादीच्या

कब्ज्यात असता तर त्याबद्दल कथन करुन तो पुर्वीच दाखल केला गेला असता. इतकी वर्षे हा दस्त असल्याबद्दल या दाव्यात कथन का केले नाही याबद्दलही वादी सांगत नाही. त्यामुळे अर्ज रद्द व्हावा अशी विनंती करण्यात आली आहे.

**५.** याकामी उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**६.** सदर दावा वादीने प्रतिवादी क्र.१ ते ६ विरुध्द त्यांनी वादीच्या नोंद खरेदीपत्र क्र.१२५६/२०११ मधील मिळकतीच्या कब्जेवहिवाटीला हरकत अडथळा करु नये म्हणुन निरंतर ताकिदीकरीता दाखल केला आहे. वादपत्र पाहता त्यामध्ये तथाकथित नोटरी दस्ताचा कुठेही उल्लेख वादीने केलेला नाही. तसेच, नोंद खरेदीपत्र क्र.१२५६/२०११ पाहता त्यामध्ये तथाकथित नोटरी दस्ताचा कुठेही उल्लेख नाही. नि.क्र.५ या तुर्तातुर्त ताकिद अर्जामध्ये वादींनी कुठेही या दस्तावरती आपली मदार ठेवलेली दिसुन येत नाही. वादीचा नि.क्र.५ हा अर्ज दिनांक १०/१२/२०१३ रोजी मंजुर झालेला असुन मुळ दावा हा २०१३ सालातील आहे.

**७.** या नोटरी दस्ताच्या अनुषंगाने, जर हा दस्त, वादीच्या कथनाप्रमाणे २४/०१/२०११ रोजी झालेला आहे, तर अशा दस्ताचा उल्लेख वादीने वादपत्रात करुन तो दस्त दाखल करणे गरजेचे होते. दावा दाखल तारखेपासुन ते नि.क्र.९६ हा अर्ज देईपर्यंत म्हणजे दिनांक ०३/०९/२०२४ पर्यंत सदर दस्त वादीच्या कब्ज्यात होता किंवा असा दस्त झाल्याचे वादीला माहित होते. या अनुषंगाने वादीने जर दाव्यात कथन केलेले नाही किंवा खरेदीपत्र नि.क्र.६० मध्येही कथन केलेले नाही तर ताकिदीचा दावा निर्गत करण्यासाठी अशा अनोंदणीकृत दस्ताची गरज नाही अशीच वादीची धारणा असल्याने त्याबद्दल दाव्यात कुठेही वादीने उल्लेख केलेला नाही.

८. याकामी दिनांक १८/०३/२०१७ रोजी निकाल झाला. मात्र पुर्नरचित मुद्यांवर पुरावा देण्यास वादी, प्रतिवादींना संधी न दिल्याने अपिल न्यायालयाने सदर दाव्यातील हुकूमनामा रद्द करुन अशी संधी देण्याकरीता सदर दावा पुन्हा या न्यायालयाकडे वर्ग केला. मुळ मुद्दे आणि पुर्नरचित मुद्दे हे उभय पक्षांच्या वादकथनांवरुन काढलेले आहेत, ज्यामध्ये प्रस्तुत तथाकथीत नोटरी दस्ताच्या अनुषंगाने कोणताही उल्लेख नाही. ज्या खरेदीपत्राने वादी मालक झाल्याचे कथन करतात त्या खरेदीपत्रावर पुरावा देऊन त्यास निशाणी देण्यात आलेली आहे.

९. दावा दाखल तारखेपासुन आजअखेर हा दस्त वादीने का हजर केला नाही, इतके दिवस हा दस्त असल्याचे ज्ञान असुनही त्याबद्दल वादीने कुठेच भाष्य का केले नाही, त्याच्यावरती मदार ठेवण्याची वादीस आत्ताच काय गरज निर्माण झाली याबद्दल वादी कुठेही नमुद करीत नाही. वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक १०/१२/२०१३ रोजी वादीने तुर्तातुर्त ताकिद मिळविल्यानंतर आणि सुरुवातीस दिनांक ३०/०१/२०१४ रोजी आणि त्यानंतर दिनांक १८/०३/२०१७ रोजी पुर्नरचित मुद्दे निघाल्यानंतर अशा स्वरुपाचा अर्ज वादीने देणे हे निव्वळ वादीस मिळालेल्या तुर्तातुर्त ताकिदीच्या आदेशाचा जास्तीत जास्त काळ उपभोग कसा घेता येईल या उद्देशाने वादी वेळकाढुपणा करीत आहे. दिवाणी अपील क्र.१९/२०१७ मध्ये पुरावा देण्याची दिलेली संधी ही मुद्दा क्र.४ वर पुरावा देण्यासाठी सीमित आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०३/०९/२०२४ रोजी उभय पक्षांच्या वकिलांनी केलेल्या निर्देशनानंतर मुद्दा क्र.४ हा प्रतिवादीने शाबीत करायचा आहे. मुद्दा क्र.२ आणि ५ हे कायदेशीर तत्वांवरती आधारीत मुद्दे आहेत. मुद्दा क्र.४ ची शाबीतीची जबाबदारी प्रतिवादींची आहे. अशा परिस्थितीत, वादीने पुरावा देण्याचे कारण नाही. वादीतर्फे वकिल श्री.उप्पे यांनी दिनांक ०३/०९/२०२४ रोजी केलेल्या युक्तिवादामध्ये प्रतिवादींचा मुद्दा क्र.४

वरचा पुरावा झाल्यानंतर त्या मुद्यावरचा विरोधी पुरावा देण्याचा हक्क वादींना आहे असे नमुद केले. जे योग्य आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत घडीला वादींना पुरावा देण्याचेच कारण नाही. प्रतिवादींनी मुद्दा क्र.४ वर पुरावा दिल्यानंतर तेवढयाच पुरता विरोधी पुरावा देण्यास वादींना संधी आहे.

**१०.** सदरचे प्रकरण मा. ना. उच्च न्यायालयाने आखुन दिलेल्या सी.आय.एस. प्रणालीमध्ये तात्काळ प्रकरण या सदरात आहे. त्यामुळे याकामी प्रस्तुतचा अर्ज अप्रस्तुत असल्याने, तथाकथीत दस्ताबद्दल कोठेही वादकथन नसल्याने अशा दस्ताबद्दल पुरावा घेण्याचे कारण नाही. सबब, नि.क्र.९६ हा अर्ज नामंजुर करण्यात येतो व त्याअनुषंगाने दिलेला नि.क्र.९९ हा अर्ज निरर्थक ठरतो. सबब, आदेश -

## <u>आ दे श</u>

नि.क्र.९६ हा अर्ज नामंजुर करण्यात येतो आणि नि.क्र.९९ हा अर्ज निरर्थक ठरतो.

**स्वाक्षरीत/-**
**दिनांक : ०३/१०/२०२४.** **( एस.एन.सरडे )**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**